*ऑटो रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी महामंडळ त्वरीत स्थापन करावे*

*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश*
=====================================================

ऑटो रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी महामंडळाच्या स्थापनेसाठी एक समिती गठीत करण्यात यावी व त्वरीत महामंडळ स्थापन करण्यात यावे असे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक- मालक असोसिएशन, चंद्रपूर या संघटनेच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली दि. 20 नोव्हेंबर रोजी मंत्रालयात बैठक संपन्न झाली. यात प्रामुख्यांने ऑटो रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करणे व चंद्रपूरातील ऑटो रिक्षा चालकांना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत म्हाडा कॉलनीतील घरे 4.50 लाखापर्यंत उपलब्ध करण्यात यावी या विषयांवर चर्चा झाली.

राज्यातील ऑटो रिक्षा चालकांसाठी कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याची घोषणा अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यावर्षीच्या अर्थसंकल्पात केली होती. त्याअनुषंगाने सदर महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही तातडीने पुर्ण करून एका महिन्याच्या आत महामंडळ स्थापन करण्याचे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले. चंद्रपूरातील ऑटो रिक्षा चालकांना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत म्हाडा कॉलनीतील घरे 4.50 लाखापर्यंत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागाने त्वरीत ऑटो रिक्षा चालकांसोबत स्वतंत्र बैठक घेऊन चर्चा करावी व आठवडयाभरात याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

या बैठकीला वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव श्री मदान, परिवहन विभाग, कामगार विभाग, गृहनिर्माण विभागाच्या अधिका-यांसह महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक- मालक असोसिएशन, चंद्रपूर चे संस्थापक राजेंद्र खांडेकर, जिल्हाध्यक्ष बळीराम शिंदे, मधुकर राऊत, अब्बासभाई, बंटी मालेकर, अरविंद तांबटकर, विनोद चन्ने, विलास बावने, राजेश किरणकर, सतीश बोरघाटे यांची उपस्थिती होती.